# संपूर्ण बाळकराम

**राम गणेश गडकरी**

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**संपूर्ण बाळकराम : राम गणेश गडकरी**

© **प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८ ई वॉर्ड, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
मे, २०१२

**किंमत**
रुपये १८०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

# संपूर्ण बाळकराम

# संपूर्ण बाळकराम

आपले गुरु श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्यावर गडकऱ्यांनी नाट्यलेखनाच्या क्षेत्रात सर्वांगाने मात केली.

मात्र कोल्हटकरांच्या सामाजिक चिंतनाचे आणि बुद्धिवादाचे सखोल भान गडकऱ्यांजवळ नसल्याने स्फुट विनोदी लेखनात मात्र त्यांना आपल्या गुरुंवर मात करता आली आहे.

'बाळकराम' या टो या पुस्तकात एकत्रित करण्यात आले आहेत. त्यातील वधूसंशोधनाच्या आपल्याकडच्या जीवघेण्या प्रकाराचे केलेले विडंबन अतिशयोक्तिपरतेमुळे कामगिरीच्या दृष्टीने रिकामे वाटण्याची शक्यता आहे. या अतिशयोक्तीच्या पाठीमागे दडलेले कारुण्य मात्र अंत:करणाला जाऊन मिळते.

उमेदवारीच्या काळात त्यांनी 'रंगभूमी' मासिकात 'सवाई नाटक्या' व 'दीडशहाणा' या नावाने केलेले लेखन म्हणजे त्यांच्या विनोद लेखनाचा श्रीगणेशाच होय.

गडकऱ्यांच्या भावी सामर्थ्याचे काही तेजस्वी तारे याही लेखनात आढळतात.

# अनुक्रमणिका


- रिकामपणाची कामगिरी ............. ९
- लग्नाच्या मोहिमेची पूर्वतयारी ............. ३३
- लग्न मोडण्याची कारणे ............. ४८
- स्वयंपाकघरांतील गोष्टी ............. ६०
- कवींचा कारखाना ............. ७१
- नाटक कसे लिहावे ? ............. १००
- ईशस्तुति ............. १०६
- प्रस्तावनेच्या इतर बाजू ............. ११०
- छोट्या जगूचा 'रिपोर्ट' ............. ११७
- नाटक कसें पाहावें ? ............. ११९
- संगीत मूकनायक ............. १४२
- दीडपानी नाटक ............. १५२
- सकाळचा अभ्यास ............. १५६
- दिवाळसणावर संक्रांत ............. १६६
- धडा सहावा ............. १६९
- कवींचा कारखाना ............. १७१
- कवींचा कारखाना ............. १७८
- माझ्या मासिकाचा खास अंक ............. १८१


✦✦✦

# रिकामपणाची कामगिरी
## वर संशोधन

**अडला हरि गाढवाचे पाय धरी ।।**

**– व्यवहारकोश**

वसंत ऋतूत आपल्या सृष्टीमध्ये केवढाले फेरफार घडून येतात हे नव्याने कशाला सांगावयाला पाहिजे? झाडांना पालवी फुटते, अंब्याला मोहोर येतो, वेलींना फुले येतात, ठिकठिकाणच्या वक्त्यांना शब्द फुटतात, पांढऱ्या सशांना पोरं होतात, मेढ्यांवरची लोंकर कातरतात, कोकिळेला कंठ फुटतो, छत्र्यांवर नवे अभ्रे चढतात, शहराबाजारांतून खेडेगावच्या पाहुण्यांना ऊत येतो, मोराला नवा पिसारा फुटतो, कुत्र्यांना लूत लागते, तोरणां-करवंदांचे पेव फुटते, कलिंगडे विकावयास येतात, वगैरे हजारों घडामोडींनी चराचरसृष्टि अगदी गजबजून जाते. या चमत्कारसृष्टींतच आणखी एका चमत्कारमय फेरफाराची गणना करावयास पाहिजे, वसंतोत्सवाच्या सुमारास अनेक फेरफारांप्रमाणेच नवऱ्या मुलांची व त्यांच्याा आईबापांची माथी फिरत असतात! पिसाळलेले कुत्रे चावलेला मनुष्य ज्या प्रमाणे आगोठीच्या मेघांचा गडगडाट ऐकताच पुन्हा पिसाळतो, त्याप्रमाणेच मुंजीच्या वाजंत्र्यांचा कडकडाट कानी पडताच 'उपवधू' मुलांच्या व त्यांच्या वाडवडिलांच्या अंगी भिनलेले अहंपणाचे विषही तडाक्यासरशी उचल खात असते. क्षणार्धात त्यांना आपल्या स्थितीचा, आपल्या किंमतीचा, आपल्या योग्यतेचा, किंबहुना आपल्या स्वत:चाही विसर पडून ते अंकगणिताचे पुस्तक रचणाऱ्या संख्या- पंडिताप्रमाणे सरसहा मोठमोठाल्या रकमा बडबडू लागतात, आणि बिचाऱ्या मुलींच्या बापांना ही अवघड उदाहरणें सोडवावी लागतात. ईश्वराच्या दयेने मला स्वत:ला मुलगी नाही! परंतु काही स्नेह्यासोबत्यांबरोबर

करमणुकीखातर खेटे घालून या बाबतीत मी जो अनुभव मिळविला आहे, त्याचा फायदा मी उदार बुद्धीने वाचकांना देण्याचे योजिले आहे.

या सुमारास प्रत्येक 'नवरबापा'चे मन म्हणजे थोरथोर ऐतिहासिक पुरुषांच्या गुणविशेषांचे प्रदर्शनच बनून जातें, असें म्हणण्यास हरकत नाही. महंमद गिजनीच्या धनलोभाने तो स्वार्थपरायण होतो, नेपोलियनच्या महत्त्वाकांक्षेने तो आपल्या मुलाकडे पाहतो, नाना फडणिसाच्या व्यवहारकौशल्याने तो मुलाची किंमत ठरवितो, शिवछत्रपतींच्या धाडसाने वाटेल त्या विजापुरकरावर तो त्या रकमेचा मारा करतो, आणि नादिरशहाच्या क्रूरपणाने ही रक्कम वसूल करून घेतो. त्या एकाच हृदयांत रजपुतांचा शिपाईबाणा आणि मराठ्यांच्या गनिमी कावा हे एकाच वेळी उचंबळीत असतात. अष्टवसूंच्या अंशांपासून उत्पन्न झालेल्या भीष्माचार्याप्रमाणे, अनेक ऐतिहासिक पुरुषांच्या हा मानसपुत्रही, मुलाचा अव्वाच्या सव्वा हुंडा घेण्याची भीष्मप्रतिज्ञा करतो, आणि तितक्याच नेटाने ती तडीसही नेतो. स्वत: नवरामुलगा तर हरभऱ्याच्या झाडावरच रात्रंदिवस मुक्काम करून 'बापसे बेटा सवाई' ही म्हण वाजवीपेक्षा फाजील खरी करून दाखवीत असतो. आपल्या अंगच्या लोकोत्तर गुणांनी अनेक म्हणींची नायिका होऊन बसलेली वरमाई तर – परंतू 'अनिर्वर्णनीयं नाम परकलत्रम्!'

अशा प्रकारच्या मनोवृत्तीच्या लोकाशी प्रसंग पडत असल्यामुळे एका मुलीचे लग्न जमविणे म्हणजे आपली एखादी कविता एखाद्या प्रमुख मासिक पुस्तकांतून छापवून आणण्याइतकेच कठीण कार्य होऊन पडते! कविता व कन्या या जोडीतले हे साम्य लक्षात आले, म्हणजे कवितेला कवीची कन्यका म्हणणाऱ्या पहिल्या कल्पक मनुष्याची खरोखर तारीफ करावीशी वाटते!

एकदोन पिढ्यांपूर्वी मुलीच्या बापावर मुलाची परीक्षा पाहण्याची जबाबदारी असे. साधारणत: या परीक्षेस अक्षर काढणे. श्लोक म्हणणे, एक भले मोठे पागोटें डोकीवर घालून व लांबलचक अंगवस्त्र अंगाभोवती लपेटून भावी सासऱ्यासमोर आपला तोल सांभाळून नीट बसणे, पत्रावळी लावणे, हेच विषय असत. आमच्या आधुनिक विद्वानांना ही विषयांची यादी पाहून हसू येईल; परंतु या विषयांच्या मुळाशी केवढे व्यवहारज्ञान दडी मारून बसले आहे, याची मात्र त्यांना कल्पनाही होणार